**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक :–०५/०९/२०२२

## प्रेस नोट

**आरोपी आलोसे श्री. दिनेश दिलीप भामरे, प्रभाग समन्वयक (कंत्राटी), बचत गट चिंचपाडा प्रभाग व करंजी खुर्द (प्रभारी), ता. नवापूर (जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान), जि. नंदुरबार यांनी १०,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबत...**

---

यातील मुळ तक्रारदार या सन १०१९ पासून प्रभाग समन्वयक (जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान येथे) म्हणून कार्यरत असून त्यांची ११ महिन्याचे करारावर नियुक्ती झालेली आहे. सदर कराराचे प्रत्येक वर्षी नुतनीकरण करावे लागते. यातील आलोसे श्री.दिनेश दिलीप भामरे हे देखील बचत गट चिंचपाडा प्रभाग व करंजी खुर्द (प्रभारी चार्ज), ता. नवापूर या प्रभागाचे प्रभाग समन्वयक आहेत.

दिनांक ०४/०८/२०२२ रोजी आलोसे श्री. दिनेश भामरे यांनी तक्रारदार यांचेकडे कराराचे नुतणीकरण करुन देणे व बदली सोयीचे ठिकाणी करुन देण्यासाठी १०,०००/–रू. देणेबाबत सांगुन पैशांची मागणी केली होती.

दिनांक ११/०८/२०२२ रोजी 'आपलं मानधन झालेलं आहे कृपया दिलेल्या दहा हजार रूपये प्रत्येकाने ट्रान्सफर करावे मला उद्या जिल्हा कक्षाला द्यावे लागतील' असे आलोसे श्री भामरे यांनी तक्रारदार यांचे प्रभाग समन्वयक यांचे समन्वयासाठी बनविलेल्या व्हॉट्सअॅप गृपला मॅसेज केला होता. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक १२/०८/२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे आलोसे श्री. दिनेश भामरे यांचेविरुध्द तक्रार दिलेली होती.

त्याअनुषंगाने तक्रारदार यांचे तक्रारीवरुन तक्रारदार यांना पैश्यांची मागणी केली अगर कसे याबाबत पडताळणीकामी पंच साक्षीदारांसमक्ष जमजम चाईल्ड केअर हॉस्पिटल, नंदुरबार. ता.जि. नंदुरबार येथे पाठविले असता आलोसे श्री. भामरे यांनी," नऊ नवशे पण नाही, दहा शंभर पण नाही, तुम्हाला दहा हजार द्यायचे आहेत तुम्हाला शक्य झाले तर ऑनलाईन ट्रान्स्फर करा" असे सांगून जिल्हा कक्ष, नंदुरबार यांचे नावे १०,०००/– रुपये लाचेची मागणी केलेबाबत निष्पन्न झालेले आहे. तरी जिल्हा कक्ष, नंदुरबार यांचे नावाने १०,०००/– रुपये लाचेची मागणी केली म्हणुन नंदुरबार शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर कामगिरी मा. श्री.सुनिल कडासने, पोलीस अधीक्षक, लाप्रवि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा. नारायण न्याहाळदे, अपर पोलीस अधीक्षक,

Scanned with CamScanner

लाप्रवि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक मा. श्री. सतिश भामरे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक तसेच मा. श्री. राकेश चौधरी, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, नंदुरबार युनिट यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक माधवी वाघ, पोलीस निरीक्षक समाधान वाघ, पोहवा पाटील, पोहवा ठाकरे, पोना मनोज अहिरे, पोना गावीत, मपोना पाटील, पोना मराठे, चापोना महाले, ॲकब्यु ,नंदुरबार पथकाने केलेली आहे.

तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबारतर्फे नागरिकांना आवाहन करण्यांत येत आहे की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयाशी दूरध्वनी नंबर (०२५६४) २३०००९, मोबाईल नंबर. ९४२३८४५२१२, ९८२३३७३८०१ व टोल फी क्र.१०६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन मा.श्री.राकेश चौधरी, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार यांनी केलेले आहे.

(माधवी एस. वाघ)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि.नंदुरबार

**Email ID:-www.dyspacbnandurbar@gmail.com**
**Mobile App :-www.acbmaharashtra.net**
**Facebook Page :- www.Facebook.com/MaharashtraACB**

Scanned with CamScanner